मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.१०३/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१२६/२०१६
अश्वीनी व इतर –वि.– राजु व इतर
**<u>निशाणी क्र.५७</u>**

## अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक ४ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव– गौरीशंकर श्रावण पाबळे,
वय– ४० वर्षे, व्यवसाय– पोलीस निरीक्षक,
वडाळा पोलीस ठाणे मुंबई.

**सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. हरीश रावळ यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

१. २०१५ मध्ये मी सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर नांदुरा पोलीस ठाण्यात कार्यरत होतो. दिनांक ०८/१०/२०१५ रोजी रात्री ९:०० ते ९:३० दरम्यानची घटना आहे. त्यावेळी पोलीस ठाण्यात फोन आला की, एस.पी.एम.कॉलेज जवळ अपघात झाला आहे. त्यामुळे कर्तव्यावर हजर असणारे ए.एस.आय. राठोड हे घटनास्थळी हजर झाले. त्यांनी घटनास्थळी जावुन पंचनामा केला होता. निशाणी क्र.२९ वरील पंचनामा तोच असुन त्यावर राठोड आणि दोन पंचांच्या सह्या आहेत. राठोड यांची सही मी ओळखतो. पंचनाम्यातील मजकुर बरोबर आहे.

२. त्यानंतर श्री अमोल तायउे यांच्या तक्रारीवरुन भादवी कलम २७९, ३०४अ आणि मोटर वाहन अधिनियम कलम १३४ अन्वये गुन्हा रजिष्टर क्र.१३६/२०१५ नोंदविण्यात आला होता. तो गुन्हा ए.एस.आय. राठोड यांनी नोंदविला होता. निशाणी क्र.२८ वरील प्रथम खबरीवर ए.एस.आय. राठोड यांची सही आहे ती मी ओळखतो. त्या गुन्ह्याचा तपास मी केला होता. मयताचा इनक्वेस्ट पंचनामा मी तयार केला होता तो निशाणी क्र.३० वर आहे. पहिल्या खबरीनुसार अपघातस कारणीभुत असणारे वाहन आयशर कंपनीचे विटकरी रंगाचे एम.एच.०६ एक्यु ५५१५ या क्रमांकाचे होते. त्या वाहनाचा शोध घेण्यासाठी आर.टी.ओ. बुलढाणा यांच्याकडे

पत्रव्यवहार केला होता. ते वाहन रायगड आर.टी.ओ. यांच्याकडे नोंदणी झाले असल्याने रायगड येथे कर्मचारी पाठवण्यास पोलीस अधिक्षक बुलढाणा यांना मी पत्र पाठविले होते. त्यातील मजकुर बरोबर आहे. ते पत्र **निशाणी क्र.५८** वर आहे.

३. मी रायगड येथील आर.टी.ओ. कार्यालयास दोषी वाहनाबाबत माहिती मिळण्याचे पत्र दिले होते. त्या पत्राची प्रमाणीत प्रत **निशाणी क्र.५९** वर आहे. आर.टी.ओ. रायगड यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर वाहन जळगाव आर.टी.ओ. यांच्याकडे ट्रन्सफर झालेले आहे. ती माहिती **निशाणी क्र.६०** वर आहे. जळगाव येथील आर.टी.ओ. कार्यालयास ए.एस.आय. पाटील यांनी पत्र देउन त्या वाहनाची माहिती मिळण्यास विनंती केली. ते पत्र **निशाणी क्र.६१** वर आहे. मिळालेल्या माहितीनुसार त्या वाहनाची मुळ नोंदणी रामपाल शर्मा यांच्या नावे करण्यात आली होती आणि नंतर ते वाहन राजु रामा चौधरी, जळगाव यांच्या नावे ट्रन्सफर झाले असे जळगाव आर.टी.ओ. कार्यालयातुन कळाले. ए.एस.आय. पाटील यांनी त्या वाहन मालकाचा शोध घेउन त्यास समजपत्र दिले. आता मला दाखविलेले समजपत्राची सत्यप्रत असुन त्यावर ए.एस.आय. पाटील यांची सही आहे ती मी ओळखतो. ती **निशाणी क्र.६२** वर आहे.

४. दोषी वाहनाचा मालक राजु चौधरी हे पोलीस ठाण्यात हजर झाल्यानंतर त्यांचा जबाब मी नोंदविला. राजु चौधरी यांचा जबाब मी नोंदविला होता. त्यावर माझी सही आहे. त्याची सत्यप्रत **निशाणी क्र.६३** वर आहे. राजु चौधरींनी सांगितले होते की अपघात घडला त्या कालावधीत ते आजारी असल्याने दोषी वाहन त्यांनी किरण प्रकाश तायडे यांना चालवण्यासाठी दिले होते व ते वाहन घटनेच्या दिवशी घटनास्थळाच्या बाजुने आले होते. राजु चौधरी यांनाच मी पत्र दिले होते की किरण तायडे यांना पोलीस ठाण्यात हजर करा. ते पत्र **निशाणी क्र.६४** वर आहे.

५. फिर्यादीमध्येच नमुद करण्यात आले होते की, महेंद्र दिनकर पाटील नावाच्या इसमाकडून त्यांना दोषी वाहनाचा क्रमांक समजला होता. त्यामुळे मी महेंद्र दिनकर पाटील यांचा जबाब आणि पुरवणी जबाब नोंदविला. त्यांच्या जबाबाची सत्यप्रत

**निशाणी क्र.६५** वर तर पुरवणी जबाबाची सत्यप्रत **निशाणी क्र.६६** वर आहे. फिर्यादी अमोल जनार्दन तायडे यांचा जबाब मी नोंदविला होता. त्याची सत्यप्रत **निशाणी क्र.६७** वर आहे.

६. ०१/०१/२०१६ रोजी मी आरोपीस अटक केली होती आणि त्याचा अटक पंचनामा मी तयार केला होता. त्याची सत्यप्रत **निशाणी क्र.६८** वर आहे. तपासादरम्यान वाहनाचे कागदपत्र परवाना हस्तगत केला. निशाणी क्र.२७ वरील फॉर्म कॉम्प ए.ए. मी दिलेला असुन निशाणी क्र.३४ वरील परवाना, निशाणी क्र.३५ वरील विमा, निशाणी क्र.३६ वरील फिटनेस प्रमाणपत्र व निशाणी क्र.३३ वरील नोंदणी प्रमाणपत्र हे दस्त मी साक्षांकित करुन दिलेले होते. तपासामध्ये निष्पन्न झाले होते की आरोपी किरण प्रकाश तायडे याने आयशर क्र.एम.एच.०६ एक्यु ५५१५ हे निष्काळजीपणाने चालवुन मोटरसायकल क्र.एम.एच.२८ एइ १३४२ ला धडक दिली आणि त्यावरील चालक मयत बाळकृष्ण तायडे याच्या मृत्युस तो कारणीभुत झाला. त्याप्रमाणे निशाणी क्र.३२ वरील दोषारोपपत्र दाखल केले. मला आजरोजी समन्स प्राप्त झाले आहे आणि सोबत केसडायरी आणलेली आहे.

सरतपास पुर्ण.

**गैरअर्जदार क्र.१ तर्फे एकतर्फी असल्याने उलटतपास नाही.**

**गैरअर्जदार क्र.२ तर्फे कोणीही हजर नसल्याने उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2023.10.04 16:11:02 +0530

दिनांक : ०४/१०/२०२३

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन पाहीले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2023.10.04 16:11:08 +0530

दिनांक : ०४/१०/२०२३

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.